www.rajdand.com
सातारा
रविवार, १० मार्च २०२४
पृष्ठ ४ ! मुल्य ४ ! वर्ष २५ ! अंक १८४
rajdandlive
Reg.No.MAHMAR/17902/1999

मराठी माणसाचा मानदंड
राजदंड
स्थापना १९९९
२५ वर्षे विश्वासार्हतेची

# आज मी तुमच्यासमोर बारामतीचा उमेदवार जाहीर करतोय

## शरद पवारांची भोरमध्ये मोठी घोषणा!

**पुणे :** सुप्रिया सुळेंचे संसदेतील काम बोलकं आहे, त्यामुळे आज मी तुमच्यासमोर बारामतीचा उमेदवार जाहीर करतो असं सांगत शरद पवारांनी सुप्रिया सुळे यांच्या नावाची घोषणा केली आहे. संग्राम थोपटेंनी आपल्योसोबत राहावे, शरद पवार पाठिशी असल्यावर विकास काय असतो ते मी दाखवून देईन असंही ते म्हणाले. ते भोरमधील सभेत बोलत होते.

सुप्रिया सुळेंच्या प्रचारासाठी बारामती लोकसभा मतदारसंघातील भोरमध्ये सभेचं आयोजन करण्यात आलं होतं. काँग्रेसचे आमदार संग्राम थोपटे यांनी या सभेचं नियोजन केलं होतं. त्यामध्ये बोलताना शरद पवारांनी आपल्या पक्षाच्या पहिल्या उमेदवाराची घोषणा केली. त्यामुळे बारामतीमध्ये आता सुप्रिया सुळे विरुद्ध सुनेत्रा पवार अशी लढत होणार आहे.

अनंतराव थोपटेंसोबतचा ४० वर्षांचा संघर्ष मिटवला

भोरचे आमदार संग्राम थोपटे यांचे वडील आणि माजी मंत्री अनंतराव थोपटे आणि शरद पवार यांचा गेल्या ४० वर्षांपासून राजकीय संघर्ष आहे. त्यांचा हा संघर्ष पुढच्या पीढीमध्ये म्हणजे अजित पवार आणि संग्राम थोपटेंमध्येही असल्याचं दिसून येतंय. आता बदलत्या राजकारणाचा वेध घेत शरद पवारांनी भोरच्या सभेच्या आधी अनंतराव थोपटे यांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली आणि हा ४० वर्षांचा संघर्ष मिटवला. त्यामुळे थोपटे यांचे वजन आता सुप्रिया सुळे यांच्या पारड्यात पडणार हे निश्चित झालं असून त्यामुळे अजित पवारांची मात्र अडचण वाढणार असल्याचं दिसून येतंय.

मोदी फक्त गुजरातचा विचार करतात.

ते इतर साधन संपत्ती हिसकावून गुजरातला नेतात. गुजरातबद्दल आम्हाला आस्था आहे, पण इथले नुकसान करुन गुजरातला फायदा केला जातोय. जो व्यक्ती राज्याच्या बाहेर विचार करत नाही तो देशाचा पंतप्रधान होऊ शकत नाही.

**काय म्हणाले शरद पवार?**

**मी जेव्हा देशाचा कृषीमंत्री झालो तेव्हा देशात फक्त एक महिना पुरेल एवढा अन्नाचा साठा उपलब्ध होता. अनेक निर्णय घेऊन ही परास्थिती बदलली. एक दिवशी यवतमाळातील एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. मी मनमोहनसिंग यांना भेटलो आणि त्यांना म्हटले की आपण या शेतकऱ्याच्या घरी जाऊन त्याने आत्महत्या का केली हे पाहिले पाहिजे. आम्ही गेलो आणि कर्जबाजारीपणामुळे त्याने आत्महत्या केल्याच समजलं. त्यानंतर आम्ही शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यचा निर्णय घेतला.**



संजय राऊत आणि अनिल देशमुख यांना सत्तेचा दुरुपयोग करून तुरुंगात टाकलं. आज मी तुमच्यासमोर सुप्रियाचे नाव उमेदवार म्हणून जाहीर करतोय. सुप्रिया सुळे यांचे संसदेतील काम बोलकं आहे.

संग्राम थोपटे तुम्ही या तालुक्यासाठी, राज्यासाठी, देशासाठी जे काही कराल त्यासाठी मी तुमच्या मागे राहीन. या आधी आपले रस्ते वेगळे असतील किंवा नसतील, पण तुम्ही आमच्या सोबत रहा. शरद पवार पाठिशी असल्यावर विकास काय असतो हे मी तुम्हाला दाखवून देईन.

# लोकसभा निवडणुकीच्या आधी निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांचा राजीनामा



**दिल्ली :** लोकसभा निवडणूक येत्या आठवड्यात जाहीर होऊ शकते त्याआधीच एक मोठी बातमी समोर आली आहे. निवडणूक आयुक्त अरूण गोयल यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यांचा कार्यकाळ २०२७ पर्यंत होता. मात्र त्यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे आणि अरूण गोयल यांनी दिलेला हा राजीनामा राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजूर केला आहे. निवडणूक आयोगात आधीच निवडणूक आयुक्त हे एक पद रिक्त होतं. गोयल यांनी राजीनामा दिल्यानंतर आता मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्याकडेच पदभार आहे. निवडणूक आयोगात मुख्य निवडणूक आयुक्ताशिवाय इतर दोन आयुक्त असतात. आधी एक पद रिक्त होतं त्यानंतर आता अरूण गोयल यांनी राजीनामा दिला आहे. त्यामुळे आता ही दोन्ही पदं रिक्त झाली आहेत.

अरूण गोयल यांचा राजीनामा मंजूर

लोकसभा निवडणूक पुढच्या आठवड्यात जाहीर होण्याची चिन्हं आहेत. आता निवडणूक व्यवस्थित पार पडावी यासाठीची संपूर्ण जबाबदारी मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या खांद्यावर असणार आहे. निवडणूक तयारी कशी सुरु आहे यासाठी अरूण गोयल यांनी राजीव कुमार यांच्यासह काही राज्यांचा दौरा केला होता. आता अचानक त्यांनी तडकाफडकी आपलं पद सोडलं आहे. राष्ट्रपतींनी त्यांचा राजीनामा स्वीकारला आहे. ९ मार्च २०२४ म्हणजेच आजपासूनच हा राजीनामा स्वीकारला गेल्याचं राष्ट्रपती कार्यालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे.

### अरूण गोयल यांची नियुक्ती वादात

**अरूण गोयल हे १९८५ च्या बॅचचे आयएस अधिकारी आहेत. १८ नोव्हेंबर २०२२ ला त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली होती. त्यानंतर लगेचच म्हणजेच १९ नोव्हेंबर २०२२ ला निवडणूक आयुक्त म्हणून त्यांची नेमणूक करण्यात आली. त्यांची नियुक्ती वादात अडकली होती. या नियुक्तीला सर्वोच्च न्यायालयात आव्हानही देण्यात आलं होतं. अरूण गोयल यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे तर मग त्यांना इतक्या तातडीने निवडणूक आयुक्तपद का दिलं गेलं? असं सर्वोच्च न्यायालयाने सरकारला विचारलं होतं.**

## सुप्रिया सुळेंचा अजित पवारांवर हल्लाबोल




**पुणे :** राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाच्या नेत्या तथा खासदार सुप्रिया सुळे यांनी पुणे जिल्ह्यातील हरिश्चंद्री येथे बोलताना शिंदे गट, भाजपा आणि अजित पवार गटावर सडकून टीका केली. उद्धव ठाकरे यांचाच पक्ष खरी शिवसेना आहे. तसेच शरद पवार यांचाच पक्ष ही खरी राष्ट्रवादी आहे, असे यावेळी त्या म्हणाल्या. विशेष म्हणजे प्रेमाने पक्ष मागितला असता तर आम्ही तो दिलदारपणे दिला असता, असेही सुप्रिया सुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना उद्देशून त्यांचे नाव न घेता म्हणाल्या.

**.तर तुम्ही कोणता पर्याय निवडला असता**

सुप्रिया सुळे यावेळी बोलताना म्हणाल्या की, सगळे म्हणतात माझ्या भाषणाला आजकाल धार आली आहे. हो आली आहे. कारण माझ्यापुढे दोन मार्ग होते. एका बाजूला सत्ता आणि अदृश्य शक्ती होती. तर दुसऱ्या बाजूला विचार, संघर्ष आणि वडील होते. माझ्या जागेवर तुम्ही असते तर तुम्ही कोणता पर्याय निवडला असता. सुप्रिया सुळे नेहमी संघर्ष निवडेल. त्यांनी अन्याय केला आहे. बाळासाहेब ठाकरे हे आमच्यासाठी वंदनीय आहेत. उद्धव ठाकरे हे आमच्यासाठी मोठ्या भावासारखे आहेत. बाळासाहेब ठाकरे यांनीच शिवसेना पक्ष स्थापन केला. बाळासाहेबांनींच उद्धव ठाकरे यांच्याकडे पक्ष दिला. १० वर्षे काम पाहून आपण सर्वांनी उद्धव ठाकरे यांना नेता मानलं. पण अदृश्य शक्तीने काय जादू केली माहिती नाही.

त्यांनी जे चोरून नेलं आहे, त्याला तुम्ही सगळे उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेला ठाकरे गट म्हणताप मी म्हणते ठाकरे गट वगैरे काही नाही. आपल्यासाठी एकच सेना आहे. ती म्हणजे उद्धव ठाकरे यांची शिवसेना. त्यांनी जे चोरून नेलं आहे, त्याला काही किंमत नाही. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाबाबतही हेच लागू होतं, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**अरे प्रेमाने मागितलं असतं तर**

**राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची स्थापना ही शरद पवार यांनी केली आहे. चिन्ह आणि पक्ष हे शरद पवार यांचेच आहेत. आमची त्यांच्याशी (अजित पवार गट) तत्त्वाची लढाई आहे. अरे प्रेमाने मागितलं असतं तर आम्ही दिलदारपणे दिलं असतं, असं सुप्रिया सुळे अजित पवार यांना उद्देशून त्यांचे न घेता म्हणाल्या. तसेच पुढे बोलताना अदृश्य शक्तीची लढाई ही मराठी माणसाच्या विरोधात आहेत. आम्ही महाराष्ट्राचं वाटोळं करू असं अदृश्य शक्तींना वाटत असेल तर ते आम्ही करू देणार नाही, असंही सुप्रिया सुळे म्हणाल्या.**

#### पुढील तीन वर्षात पुण्याला नवे विमानतळ

## उपमुख्यमंत्री फडणवीस यांची ग्वाही

**पुणे :** पुणेकर ज्याची आतुरतेने वाट पाहत होते, त्या पुण्यातील लोहगाव विमानतळाच्या टर्मिनलचे उद्घाटन रविवारी होत आहे. मात्र, पुढील तीन वर्षांत पुण्याला नवे विमानतळ नक्की होईल. चालू वर्षात या नव्या विमानतळाच्या भूसंपादनाचे काम सुरू करण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न आहे,अशी ग्वाही राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी दिली.

विकसित भारत म्बेसिडर, विकसित पुणे कॉन्क्लेव्ह या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. ते म्हणाले, 'पुणे विमानतळावरील नवीन टर्मिनलचे काम पूर्ण झाले आहे. त्याचे उद्घाटन रविवारी पंतप्रधान नरेंद्रमोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात येणार आहे. पुणे करयाची आतुरतेने वाट पाहत होते. मात्र, एवढ्यावरच न थांबता पुणेकरांनापुढील तीन वर्षात नवे विमानतळ मिळणार आहे. चालू वर्षात त्याचे भूसंपादनसुरू करण्याचा प्रयत्न राज्य सरकार करेल.'दरम्यान, पुणे ते छत्रपती संभाजीनगर हरित महामार्ग तयार करण्यात येत आहे. त्यामुळे पुण्यापासून संभाजीनगर येथे केवळ दोन ते अडीच तासांत पोहोचता येणार आहे. मी पुण्याच्या अधिकाधिक जवळ येण्याचा प्रयत्न करतोय.

## महापालिकेच्या सर्व प्रसूतिगृहात आता मिळणार सुविधा

### लैंगिक हिंसाचार समस्यांवर महिलांना 'दिलासा'



**मुंबई :** लैंगिक हिंसाचाराला सामोरे जावे लागणाऱ्या महिलांना त्यांच्या घराजवळ वैद्यकीय त्याचप्रमाणे कायदेशीर सेवा पुरवता यावी, या दृष्टिकोनातून महानगरपालिकेच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या पार्श्वभूमीवर नवीन उपक्रम हाती घेतला आहे. त्यामुळे महानगरपालिका रुग्णालयांमध्ये असलेल्या 'दिलासा' केंद्रांचा आता महानगरपालिकेच्या सर्व प्रसूतिगृहांमध्ये 'दिशा' केंद्रांच्या स्वरुपात विस्तार करण्यात येणार आहे. एवढेच नव्हे तर लैंगिक व घरगुती हिंसाचाराविषयी आरोग्य आपल्या दारी योजनेतूनही जनजागृती करण्यात येणार आहे.

महिलांना लैंगिक हिंसाचार (जेंडर बेस्ड व्हायलन्स) घटनांना मोठ्या प्रमाणात सामोरे जावे लागते. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांमध्ये महिलांना तत्परतेने प्रतिसाद देण्यासह आवश्यक त्या मदतीचा विस्तार करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. इकबाल सिंह चहल यांनी निर्देश दिले होते.

महानगरपालिकेच्या १२ रुग्णालयांमध्ये सध्या कार्यरत असलेल्या 'दिलासा' केंद्रांचा विस्तार केला जाणार आहे. कौटुंबिक हिंसाचार हा महिलांवरील हिंसाचाराचा अत्यंत व्यापक प्रकार आहे. राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षण (एनएफएचएस)-५ मधील माहितीनुसार, नागरी भागांमध्ये २४ टक्के महिलांना जोडीदाराकडून हिंसाचार तसेच १८ ते ४९ वयोगटातील २.५ टक्के गर्भवती महिलांना शारीरिक हिंसाचाराचा सामना करावा लागला आहे. हिंसाचाराच्या अशा घटनांचा एकूण विचार करता ७७ टक्क्यांपेक्षा जास्त महिलांनी अशा घटना अथवा अनुभवांबद्दल थेट तक्रार करणे किंवा बोलणे टाळले आहे.




**पुणे :** पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहराची प्रमुख सार्वजनिक सेवा असलेल्या पीएमपीसाठी महापालिकेकडून विजेवर धावणाऱ्या ५०० गाड्यांची खरेदी करण्यात येणार आहे. त्यामुळे पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढणार असून प्रवाशांना जलद सेवा मिळण्यास मदत होणार आहे. पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील किमान १० लाख प्रवाशांची पीएमपी ही प्रमुख सार्वजनिक सेवा आहे. त्या तुलनेत पीएमपीच्या ताफ्यातील गाड्यांची संख्या अपुरी आहे. त्यामुळे ताफ्यातील गाड्यांची संख्या वाढविण्याची मागणी सातत्याने स्वयंसेवी संस्था, प्रवासी संस्थांकडून होत होती. ही बाब लक्षात घेऊन पुढील वर्षभरात नव्याने ५०० गाड्या खरेदी करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.

पीएमपी प्रशासनाने गेल्या काही महिन्यांत काही गाड्यांची खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता. त्याबाबतचा प्रस्ताव संचालक मंडळाच्या बैठकीतही मंजूर झाला असून, गाड्या खरेदीची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू करण्यात आली आहे. येत्या काही दिवसांत त्या संदर्भातील निविदा प्रक्रिया प्रसिद्ध होणार असून, १७७ गाड्यांची खरेदी पहिल्या टप्प्यात करण्यात येणार आहे. पीएमपीच्या ताफ्यात सध्या विजेवर धावणाऱ्या ४७३ गाड्या आहेत. येत्या काही दिवसांत १७७ गाड्या दाखल होणार असून त्यामुळे ही संख्या ६५० एवढी होणार आहे. त्यामध्ये नव्याने घोषणा केल्याप्रमाणे ५०० गाड्यांची भर पडणार आहे. प्रस्तावित ५०० गाड्यांमध्ये १०० गाड्या विजेवर धावणाऱ्या, तर ४०० गाड्या सीएनजीवरील असतील, असे महापालिका आयुक्त, प्रशासक विक्रम कुमार यांनी स्पष्ट केले.

रस्ते विकसनाबरोबरच सार्वजनिक वाहतुकीच्या सक्षमीकरणालाही महापालिकेने प्राधान्य दिले आहे. पीएमपीसाठी एकूण ४८२ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. तसेच पीएमपीच्या सुतारवाडी आणि निगडी या आगारांमध्ये 'बांधा-वापरा आणि हस्तांतरीत करा' या तत्त्वावर आगारांचे व्यापारी विकसन करण्यात येणार आहे. त्यातून पीएमपीला उत्पन्न मिळण्यास मदत होणार आहे. तसेच विविध आगारांमध्ये आणि पीएमपीच्या स्वमालकीच्या मिळकतींवर ई-चार्जिंग स्टेशनही उभारण्याचे नियोजित आहे.

#### लोकसभा आचारसंहितेपूर्वी मराठा समाज घेणार मोठा निर्णय

## सोलापुरात आज तातडीची बैठक

**सोलापूर :** सकल मराठा समाज सोलापूर शहर व जिल्ह्यातील तमाम मराठा बांधवाची तातडीची बैठक रविवार १० मार्च २०२४ रोजी शासकीय विश्राम गृह, सात रस्ता सोलापूर येथे आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत आगामी लोकसभा निवडणुकीत समाजाची भूमिका काय असणार याबाबतचा निर्णय घेण्यात येणार असल्याचे सकल मराठा क्रांती मोर्चाच्यावतीने सांगण्यात आले.

या बैठकीत २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत मराठा समाजाची भूमिका ठरविण्यात येणार असून सगे सोयरे या शब्दासह ५० टक्के च्या आत ओबीसीमधून आरक्षण मिळावे म्हणून सरकार वर दबाव टाकण्यासाठी नवीन धोरण निश्चित करण्यात येणार आहे. नुकताच मनोज जरांगे यांनी आगामी निवडणुकीत निवडणुक आयोगाला कोंडीत पकडण्यासाठी वेगळी रणनिती आखण्याबाबत सुतोवाच केले होते. शिवाय निवडणुकीत राजकीय नेत्यांनी आमच्या दारात यायचं नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

एक पेपर घ्यायचा. मोठ्या अक्षरात लिहायचं, मी मतदार, पुढाऱ्यांनी माझ्या दारात यायचं नाही असं लिहून दाराला चिटकवून टाका. उद्यापासून राज्यात ही मोहिम सुरू करा. आपल्या दुचाकी, चारचाकीला तेच कागद चिटकवायचे. आता मतदान मागायला अमेरिकेत जाणार का? असं म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी सोलापूर जिल्ह्यातील एका सभेत नुकतेच समाजाला आवाहन केले तसेच सरकारवर निशाणा साधला होता. या सर्व बाबींवर आज होत असलेल्या बैठकीत निर्णय होणार असल्याचे सकल मराठा समाजाने सांगितले आहे.

**पाहिजेत**

राजदंड

२५ वर्ष सातत्याने प्रसिद्ध होणाऱ्या दै राजदंडसाठी पश्चिम महाराष्ट्रात तालुका व जिल्हा प्रतिनिधी नेमणे आहे. आपल्या परिसराची भौगोलिक, सामाजिक, राजकीय, आर्थिक जाण असलेल्या, मराठी भाषेवर प्रभुत्व असलेल्या आणि जनसंपर्क असलेल्या उमेदवारांनी संपर्क साधावा. उमेदवार पदवीधर असावा. पत्रकारिता व जनसंपर्क विषयात प्रशिक्षण घेतलेल्या व माध्यम क्षेत्रात किमान अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य

संपर्क: rajdand.pune@gmail.com

# मुनावळे प्रकल्पाचे श्रेय दुसरे कोणी घेवू नये - राजू भोसले

**सातारा :** मुनावळे जलपर्यटनासाठी दोन वर्षांपासून आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी पाठपुरावा केला होता. यासाठी तत्कालिन जिल्हाधिकारी शेखर सिंह यांचेही योगदान लाभले आहे. आता या प्रकल्पाचे शनिवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते भूमिपूजन होत आहे. याबद्दल आनंदच वाटतोय. या प्रकल्पात रोजगारासाठी स्थानिक ग्रामस्थांनाही सहभागी करुन घेण्याची गरज आहे. दरम्यान, या प्रकल्पाचे श्रेय दुसऱ्या कोणी घेऊ नये, असा सल्ला जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले यांनी दिला आहे.

सातारा येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक ज्ञानदेव रांजणे यांच्यासह जावळी तालुक्याच्या पश्चिम भागातील ग्रामस्थ उपस्थित होते.

राजू भोसले म्हणाले, आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांना दूरदृष्टी होती. पर्यटनातूनच जावळी तालुक्यात समृध्दी येईल. तेथील लोकांना रोजगार उपलब्ध होईल हे माहीत होते. त्यामुळेच त्यांनी मुनावळे जलपर्यटनासाठी दोन वर्षांपासून पाठपुरावा सुरू केला होता. यासाठी तत्कालिन जिल्हाधिकारी शेखर सिंह यांचेही योगदान लाभलेले. शनिवारी या प्रकल्पाचे भूमिपूजन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते होत आहे. याबद्दल आनंदच वाटतोय. या प्रकल्पात स्थानिक ग्रामस्थांनाही सहभागी करुण घेण्याची गरज आहे, तरच त्यांना रोजगार उपलब्ध होईल.

जिल्हा बँकेचे संचालक रांजणे म्हणाले, कोयना खोऱ्यातील ८० टक्के जनता ही मुंबई तसेच इतर ठिकाणी पोट भरण्यासाठी गेलेली आहे. त्यांना मुनावळेसह इतर प्रकल्पांच्या माध्यमातून गावाकडे आणण्याचा प्रयत्न आहे. आमदार शिवेंद्रसिंहराजे यांच्या माध्यमातूनही जावळी तालुक्यात रस्ते तसेच विविध विकासकामे होत आहेत. मुनावळे प्रकल्पाचे श्रेय दुसरे कोणी घेवू नये.

# पर्यटन वाढीसाठी महाबळेश्वर ते कोयना बॅकवाटर अप्रोच राज्य मार्ग होण्याची मागणी

## महाबळेश्वर, तापोळा, बामणोली, कास, ठोसेघर, काठी, कोयना हा परिसर पर्यटन दृष्टीने जोडला जाऊन डोंगरावरील गावांचा विकास साधला जाईल

**पाटण :** महाराष्ट्रातील थंड हवेचे ठिकाण महाबळेश्वर ते महाराष्ट्रासह अनेक राज्यासाठी भाग्यलक्ष्मी ठरलेले कोयना धरण या पश्चिम घाटावरील पर्यटन ठिकाणी पर्यटकांची वर्दळ वाढली आहे. महाबळेश्वर सह तापोळा, बामणोली, कास, ठोसेघर, काठी, कोयना हि प्रसिद्ध पर्यटन ठिकाणे या एकाच राज्यमार्गाने जोडल्यास सातारा जिल्ह्यातील महाबळेश्वर, जावली, सातारा, पाटण हे तालुके पर्यटनाच्या दृष्टीने विकासात्मक होणार आहेत.



जिल्ह्याचे सुपूत्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सातारा जिल्ह्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी महाबळेश्वर ते कोयना, कोयना बॅक वॉटर या अप्रोच राज्य मार्गासाठी प्रयत्न करावेत व सातारा जिल्ह्यात नवीन पर्यटन क्रांती घडवून आणावी अशी मागणी महाबळेश्वर, जावली, सातारा, पाटण तालुक्यातील जनतेची होत आहे.

सातारा जिल्ह्याचे सुपूत्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी महाबळेश्वर, जावळी येथील तापोळा येथे पर्यटनाच्या दृष्टीने अनेक मोठे प्रस्ताव मंजूर केले. यातील सर्वात मोठा प्रस्ताव म्हणजे खास पर्यटनाच्या दृष्टीने तापोळा येथे कोयना शिवसागर जलाशयावर जर्मन तंत्रज्ञानावर आधारित ३५० कोठी रुपये खर्च करुन केबल स्टेपुल बांधण्यात येत आहे. पुलाच्या मध्यभागी ४३ मीटर उंचीवर प्रेक्षा गैलरी बांधण्यात येणार आहे. यावरुन पर्यटकांना तापोळा परिसरातील निसर्ग सौंदर्याचा आनंद घेता येणार आहे.

या प्रेक्षागैलरीवर पोहचण्यासाठी दोन्ही बाजूने कॅप्सूल लिफ्ट बसविण्यात येणार आहेत. तसेच या गैलरीवर कॅन्टीन, रिस्वार्ट असणार आहेत. जावली तालुक्यातील मुनावळे येथे ४५ कोठी रुपये खर्च करून जागतिकदर्जाचे जल पर्यटन केंद्र बोटींग हाऊस, स्कुबा डायव्हिंग, बनाना राईड, जेट स्की, हाऊस बोट, बोट क्लब यासह पर्यटकांसाठी अत्याधुनिक सुविधा उभारण्यात येत आहेत.

या दोन्ही प्रकल्पामुळे महाबळेश्वर, तापोळा, बामणोली, मुनावळे या परिसराचाच पर्यटन विकास मोठ्या प्रमाणात साधला जाणार असून रोजगार निर्मिती देखील मोठ्या प्रमाणावर होणार आहे. या पर्यटन विकासापासून पाटण तालुका मात्र वंचित राहणार आहे.

तापोळा, मुनावळे, महाबळेश्वर येथील पर्यटन विकास साधत आसताना मुख्यमंत्री आणि पालकमंत्र्यांकडून जिल्ह्यातील इतर पर्यटन स्थळांकडे मात्र दुर्लक्ष होत आसताना दिसत आहे.

महाबळेश्वर येथून तापोळा केबल स्टेपुल ला जोडणारा मार्ग बामणोली, कास, ठोसेघर, काठी, कोयना असा कोयना बॅकवाटर अप्रोच राज्य मार्ग झाल्यास महाबळेश्वर ते कोयना हे सद्याचे अंतर ३० की.मी. ने कमी होऊन केवळ ८५ ते ९० की. मी. वर येणार आहे.

या राज्य मार्गामुळे महाबळेश्वर, जावली, सातारा, पाटण या तालुक्यातील डोंगरकपारीतील गावे एकमेकांना जोडली जाणार असून पर्यटन दृष्ट्या महाबळेश्वर, तापोळा, बामणोली, कास, ठोसेघर, काठी, कारवट, कोयना ही पर्यटन केंद्रे एकमेकांना जोडली जाणार आसताना या मार्गावर आणखी छोटी - मोठी पर्यटन केंद्र निर्माण होतील. याचा फायदा येथील स्थानिक जनतेला मोठ्या प्रमाणात होईल व रोजगाराचे नवीन दालन येथील लोकांना उपलब्ध होईल. महाबळेश्वर ते कोयना या कोयना बॅकवाटर अप्रोच राज्य मार्गासाठी जिल्ह्याचे सुपत्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री शंभूराज देसाई यांनी प्रयत्न करावेत अशी मागणी होत आहे.

# मी महाराष्ट्रात जाऊन सांगेन की शरद पवार यांनी माझ्यावर खोटे आरोप केले: आ.सुनील शेळके

**वडगाव मावळ :** शरद पवार साहेबांसारख्या मोठ्या नेत्याने माझ्यावर अशी टीका करणे हे अपेक्षित नव्हत पवार साहेबांनी केलेल्या वक्तव्यामुळे मला वाईट वाटते आहे. साहेबांनी कधीच वैयक्तिक टीका केलेली नाही. त्यांना ही खोटी माहिती देण्यात आली. मी कोणत्याही कार्यकर्त्याला दमदाटी केलेली नाही.



पुढील आठ दिवसात मी दम दिलेला एकतरी व्यक्ती त्यांनी समोर आणावा, पुरावे द्यावेत, नाहीतर शरद पवारांनी खोटे आरोप केले असे मी राज्यभर सांगणार असल्याची महिती अजित पवार गटाचे आमदार सुनील शेळके यांनी पत्रकार परिषदेत दिली.

मावळ तालुक्यातील लोणावळा येथे शरद पवार यांच्या उपस्थितीत मेळावा पार पडला.या मेळाव्यात मावळचे आमदार सुनील शेळके यांच्यावर जोरदार टीका केली. तसेच या रस्त्याला मी जात नाही, पण वेळ आली तर त्याला सोडत नाही, असा इशाराही त्यांनी आमदार शेळके यांना दिला. शरद पवार यांची सभा पार पडल्यानंतर तातडीने आमदार शेळके यांनी पत्रकार परिषद घेऊन पवारांनी केलेल्या टीकेला उत्तर दिले

यावेळी पत्रकार परिषदेत आमदार सुनील शेळके म्हणाले की, मी अजित पवार यांच्या सोबत गेलो कारण अजित पवार यांनी मला निधी दिला, माझ्या मागे उभे राहिले, त्यामुळे मी त्यांच्यासोबत का जाऊ नये? असा प्रश्न शेळके यांनी उपस्थित केला. तसेच पुढील आठ दिवसात मी दम दिलेला एकतरी व्यक्ती त्यांनी समोर आणावा, पुरावे द्यावेत, नाहीतर शरद पवारांनी खोटे आरोप केले असे मी राज्यभर सांगणार आहे असे शेळके यांनी सांगितले.

# पैठणीच्या खेळातून जागतिक महिला दिनी करकंबमध्ये माता-माऊलींच्या चेहऱ्यावर फुलले हास्य आणि समाधान



**पंढरपूर :** श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन श्री.अभिजीत आबा पाटील यांच्या वतीने माता-भगिनींना स्वतःसाठी वेळ देता यावा, मैत्रिणींच्या सहवासात त्यांना दोन क्षण स्वतःसाठी जगता यावे, या हेतूने सुप्रसिद्ध निवेदिका मोनिका जाजू यांच्या उत्कृष्ट संयोजनातून 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्याला स्थानिक माता-भगिनींकडून उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला..

यंदाचा महिला दिन व महाशिवरात्री निमित्त अत्यंत कार्यक्रम आनंदात साजरा करता आल्याबद्दल माता-भगिनींनी श्री अभिजीत पाटील यांचे कौतुक करत भरभरून आशीर्वाद दिले..

या सर्व माता-भगिनींच्या कुटुंबातील एक सदस्य, भाऊ आणि एक मुलगा म्हणून त्यांच्यासाठी कार्य करणे माझी जबाबदारी आहे. येत्या काळात त्यांच्यासाठी कार्य करण्याची ऊर्जा या आशीर्वादातून प्राप्त होईल असे सांगितले.

## महिला दिनी महिला पिडितेची सुटका

**शिरवळ :** पुणे बेंगलोर महामार्गावर शिरवळजवळ असलेल्या गोकुळ लॉजवर छापा टाकत वेश्याव्यवसाय चालक असलेल्या लॉज मालक व एक पिडीत महिला अशा दोन जणांना उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांच्या पथकाने कारवाई करत वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश केला आहे.

आज दि.८ रोजी उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे सापळा रचत बनावट ग्राहक गोकुळ लॉजवर पाठवुन वेश्या व्यवसाय सुरू असल्याची खात्री करत विनोद गोविंद अग्रवाल ( वय ५२, रा. धनगरवाडी) एक पीडित संबंधितांना ताब्यात घेत शिरवळ पोलीस ठाण्यात हजर केले. त्यानंतर केलेल्या चौकशीवरून हॉटेल मालक महिलांकडून वेश्या व्यवसाय करत असल्याचे स्पष्ट झाले. उपविभागीय पोलिस अधिकारी राहुल धस यांच्या पथकाने कारवाई करत संशयितांना पकडल्याने शिरवळमधील वेश्या व्यवसायाचा पर्दाफाश झाला आहे. याबाबत वैभवी भोसले निर्भया पथक फलटण यांच्या फिर्यादीवरून शिरवळ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला असुन पोलिस निरीक्षक संदीप जगताप अधिक तपास करत आहेत.

# कर्जाच्या नावाखाली ठगाने फसविले तर बँक कर्मचाऱ्याची अश्लील भाषेत धमकी

## ऐन महिला दिनीच महिलांचा मोठा अपमान

**पंढरपूर :** पंढरपूर तालुक्यातील देगाव या गावात गेल्या वर्षभरापासून एका खाजगी बँकेच्या फायनान्स बचत गटाच्या मार्फत महिलांना कर्ज मिळवून देतो म्हणत कुंडलिक जाधव नावाच्या एका ठगाकडून पंधरा ते वीस महिलांना सुमारे दोन ते तीन लाखांचा गंडा घालण्यात आलेला आहे.तर दुसरीकडे याच कर्ज वसुलीसाठी सदर बँकेच्या कर्मचाऱ्यांकडून महिलांना अश्लील तसेच एकेरी भाषेत वागणूक दिल्याचा प्रकार उघडकीस आल्याने संताप व्यक्त करण्यात येत आहे.



याबाबत महिलांनी दिलेली अधिक माहिती अशी की पंढरपूर तालुक्यातील आयडीएफसी फर्स्ट बँक भारत या फायनान्स मार्फत देगाव या गावांमध्ये बचत गट चालवला जातो. या बचत गटाचा देगाव मधील प्रमुख म्हणून कुंडलिक जाधव (रा.देगाव ता.पंढरपूर)च्या पत्नीची बँकेच्या वतीने निवड करण्यात आलेली होती. तसेच सदर कर्जाच्या हप्ते कुंडलिक जाधव याच्या मार्फतच बँक कर्मचाऱ्याकडे भरले जात होते.मात्र गेल्या वर्षभरामध्ये कुंडलिक जाधव याने तुम्हाला कर्ज मिळवून देतो म्हणत परस्पर दहा ते पंधरा महिलांच्या नावे बचत गटाचे कर्ज उचलून महिलांना दोन ते तीन लाखाचा गंडा घातलेला आहे. तुम्हाला कर्ज मिळवून देतो असे सांगत सदर महिलांचे फसवून अंगठे घेऊन कुंडलिक जाधव याने सदर महिलांना अंधारात ठेवत फसविले असल्याचा सदर महिलांनी आरोप केला आहे.

यातील बहुतांश महिला या आदिवासी ,अनुसूचित तसेच भटक्या जातीतील असून रोजंदारीवर काम करणाऱ्या व हातावरचे पोट असणाऱ्या आहेत. फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतरही नाईलाजाने आपल्या अंगावर कर्ज काढले गेले असल्याने गेल्या दोन-तीन महिन्यापासून या महिला सदर कर्ज कसेबसे भरत होत्या.मात्र वसुलीच्या वेळी दिल्या जात असलेल्या त्रासाला व अर्वाच्य भाषेला कंटाळून महिलांनी अखेर या प्रकारची वाच्यता केली आहे.चालू महिन्यात कर्जाचे हप्ते थांबल्यानंतर याच बँकेच्या वसुली कर्मचाऱ्याने महिलांबद्दल रात्री अपरात्री त्यांच्या घरी जाऊन अपशब्द वापरत अर्वाच्य भाषेत सदर महिलांचा अपमान केला आहे.

यावेळी सदर महिलांनी सदर कर्ज आम्ही घेतले नसून कुंडलिक जाधव यांनीच आमच्या नावाने काढलेले आहे असे सदर कर्मचाऱ्यास सांगितले असता सदर कर्मचाऱ्यांनी कुंडलिक जाधव बरोबर हळद लावून घे,भवाने त्याच्यासोबत लग्न कर पण माझा हप्ता मला पाहिजे अशा एकेरी व अर्वाच्य भाषेचा वापर करत वसुलीच्या नावाखाली धमकवल्याचे सदर महिलांचे म्हणणे आहे.

# वडगावात महाशिवरात्रीनिमित्त भाऊ बहिण भेट



**वडगाव मावळ :** ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज आणि सांगवी गावची ग्रामदेवी जाखमाता देवी भाऊ बहीण भेटीचा कार्यक्रम संपन्न झाला. महाशिवरात्रीनिमित्त ही भाऊ-बहीण भेट घडवली जाते.

पोटोबा महाराजांची पालखी वडगाव येथून सांगवी येथे गेली. तिथे जाखमाता देवी मंदिरात कार्यक्रम संपन्न झाला. सांगवीकर ग्रामस्थांनी वडगावकर ग्रामस्थांचे व पालखीचे स्वागत केले. ही भाऊ-बहीण भेटीची परंपरा १०० वर्षांपूर्वी पासून सुरू आहे.

यावेळी देवस्थानचे विश्वस्त उपाध्यक्ष गणेश आप्पा ढोरे,सचिव अनंता कुडे, विश्वस्त किरण भिलारे,चंद्रकांत ढोरे, ड अशोक ढमाले,अरुण चव्हाण, तुकाराम ढोरे,सुभाषराव जाधव, सुनिता कुडे आदि विश्वस्थासह काकडआरती भजनी मंडळाचे प्रमुख विणेकरी बबनराव भिलारे,पंढरीनाथ भिलारे,मधुकर पानसरे,सोपान मधुकर म्हाळसकर,विठ्ठलराव ढोरे,ज्ञानेश्वर म्हाळसकर,देवराम कुडे,रघुनाथ टकले,रविंद्र तुमकर,महादू खांदवे, कैलास खांदवे,बारकू खांदवे,रविंद्र म्हाळसकर,चंद्रशेखर म्हाळसकर, सोपान आगळमे,दत्तात्रय तारू,पुजारी मयूर गुरव, संतोष गुरव,आदिसह महिला भगिनी सुद्धा मोठया संख्येने उपस्थित होते.

मावळ तालुक्यातील असंख्य भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वडगावचे ग्रामदैवत श्री पोटोबा देवस्थान संस्थानचे वतीने महाशिवरात्री निमित्त महादेव मंदिरामध्ये अभिषेक करण्यात आला,

वडगाव व सांगवी ग्रामस्थांनी गेली १०० वर्षांची परंपरा जपत सांगवी येथील इंद्रायणी नदी काठी जाखमाता देवी मंदिर या ठिकाणी वडगावकर ग्रामस्थ भजनी मंडळ,श्री पोटोबा महाराजांची पालखी घेऊन येत असतात. या ठिकाणी दरवर्षीच्या प्रथेनुसार भाऊ-बहिण भेटीचा कार्यक्रम संपन्न होत असतो.

पालखी घेऊन वडगावकर ग्रामस्थ पोहोचता क्षणी सांगवी ग्रामस्थांनी त्या वेळी जंगी स्वागत केले.

इंद्रायणी स्नान होऊन भाऊ बहिण भेटीचा सोहळा संपन्न झाला. त्यानंतर भजनाचा कार्यक्रम झाला.आरती होऊन,चहा पान आणि उपवासाचे फलहार होऊन पालखी पुन्हा वडगांवच्या दिशेने परतीचा प्रवासाला मार्गस्थ झाली.

# मुनावळे प्रमाणे पाटण तालुक्यात जलक्रीडा प्रकल्प होणार : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

## जलक्रीडा प्रकल्पासाठी ७० कोठी रुपयेची घोषणा : रेशीम, बांबू प्रकल्प देखील राबवणार

**पाटण :** सातारा जिल्ह्यात गेल्या दिडवर्षात लोकाभिमुख प्रकल्प केले. याचे मला समाधान आहे. मुनावळेप्रमाणे पाटण तालुक्यात देखील जलक्रीडा प्रकल्प करतोय त्यासाठी आपण ७० कोठी रुपये मंजूर केले आहेत. रेशीम प्रकल्प, बांबू प्रकल्प जे जे प्रकल्प जावळीला केले तसेच आपल्याला पाटण तालुक्यात देखील करायचे आहे. यासाठी निधीची कमतरता पडणार नाही. याची चिंता करु नका असे मुख्यमंत्र्यांनी मोरगिरी येथे बोलताना आपल्या भाषणात सांगितले.



मोरगिरी ता.पाटण येथे तालुक्यातील दरडग्रस्त आंबेघर, ढोकावळे, मीरगाव, हुंबरळी, शिद्रुकवाडी, जितकरवाडी, काहिर या भूस्खलनबाधित गावांचे पुनर्वसन भूमिपूजन कार्यक्रम तसेच मल्हारपेठ पोलिस स्टेशन इमारत व निवास्थान, पाटण पोलिस स्टेशन कर्माचाऱ्यांचे निविसस्थान ऑनलाइन लोकार्पण, याबरोबर तहसिलदार आणि प्रांत यांना स्कार्पिओ गाड्या वितरण शुभारंभ प्रसंगी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे बोलत होते. यावेळी पालकमंत्री शंभुराज देसाई, उद्योग मंत्री उदय सामंत, जिल्हाधिकारी जितेंद्र हुड्डी, जिल्हा पोलिस प्रमुख समीर शेख, यशराज देसाई, रविराज देसाई, प्रांताधिकारी सुनिल गाढे, तहसिलदार अनंत गुरव यांची प्रमुख उपस्थिती होती.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे पुढे म्हणाले मी नगरविकास मंत्री आसताना दरडग्रस्त गावांना भेट दिली. त्यावेळी माझ्या लक्षात आले. या लोकांचे कायमस्वरूपी पुनवर्सन होणे गरजेचे होते. हे सरकार सर्वसामान्यांचे व सर्वसामान्यांच्या हिताचे लोकांसाठी कायदा नियम बाजूला ठेवून एमएमआरडीला तात्काळ निर्देश दिले पाटण तालुक्यातील दरडग्रस्त गावकरी महाराष्ट्रात राहतो महाराष्ट्राच्या बाहेर राहत नाही. त्यांना तात्काळ निधी मंजूर करा. दरग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी १६० कोठी रुपये मंजूर केले. घटना घडली त्यावेळी तात्काळ ५ कोठी रुपये मंजूर करून दिले होते. आणि आता प्रत्येक्ष कामाला सुरुवात होत आहे.

जिथे जिथे आपत्ती येते, पुर येतो, संकट येते तिथे एकनाथ शिंदे पहिल्या नंबरला आसतो. त्या त्यावेळी आपण त्यांना मदत दिलेली आहे. मग ते संकट कुठलेही आणि महाराष्ट्रातील कोणत्याही ठिकाणचे असूदे. शेवटी आपले हे सरकार लोकांसाठी व लोकांना मदत करण्यासाठी आहे.

**मी कोयनेचा सुपूत्र आहे. हे सरकार सर्वसामान्यांचे आहे. असे नेहमीच सांगणारे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यावेळी बोलताना जिल्ह्यातील पर्यटन, मोदी सरकारने, राज्य सरकारने राबविलेल्या योजनांची माहिती सांगितली. कोयना धरणात जलपर्यटन सुरू केल्याचे सांगितले मात्र धरणग्रस्तांच्या पुनर्वसन प्रश्नांवर मात्र अवाक्षरही शब्द काढला नाही. यामुळे उपस्थित धरणग्रस्तांनी नाराजी व्यक्त केली.**

घरात बसून उंटावरून शेळ्या हाकणारा हा मुख्यमंत्री नाही. थेट लोकांमध्ये जाऊन संवाद साधणारा, भेटणारा त्यांचे घारान ऐकून घेणारा मुख्यमंत्री आहे. म्हणूनच थोडक्या कालावधी मोठ्या प्रमाणात या राज्यात अनेक विकासाचे प्रकल्प आणले. याबरोबर शेतकरी, कष्टकरी, कामगार या सगळ्यांना आपण न्याय दिला. महिला सक्षमीकरणाचे धोरण आपण जाहीर केले.

महिलांना ५०% सवलत एसटी प्रवासात दिली म्हणून तोट्यात चालणारी एसटी फायद्यात आली. लेकलाडकी लखपती महिला बचतगटांना प्राधान्य देतोय. शेतकऱ्यांना वर्षाला सहा हजार रुपये यात केंद्राचे सहा हजार रुपये असे वर्षाला १२ हजार रुपये शेतकरी कुटुंबाला देण्याचा निर्णय घेतला. एक रुपयात पिक विमा. शेतकऱ्यांच्या सुखदुःखात उभे राहणारे हे सरकार आहे.

नजीकच्या काळात सातारा जिल्ह्यात अनेक प्रकल्प अनेक सुखसुविधा देण्याचा या सरकारचा प्रयत्न आहे. शिक्षण, आरोग्य या बरोबर पर्यटनाला चालना देवून रोजगारासाठी शहरात जाणाऱ्या तरुणाला येथेच रोजगार उपलब्ध करुन देण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

यासाठी पर्यटन वाढीसाठी ४२६ कोठी रूपये जिल्ह्याला मंजूर केले आहेत. यातून पर्यटनाला चालना देण्याचे काम केले आहे. आमचे सरकार आल्यापासून झालेल्या कॅबिनेट मधे पाचशेच्या वर निर्णय घेतले. म्हणून विरोधकांच्या पायाखालची वाळू सरकली आहे. मागच्या दिडवर्षात सर्वसामान्य लोकांना न्याय देण्याचे व अमुलाग्राह्य बदल घडविण्याचे काम आपण केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९
Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# क्राईम

## दोन अपघातांत दोघांचा मृत्यू

**सातारा :** सातारा तालुक्यातील आरळे व वाढे येथे दुचाकींच्या दोन अपघांत दोन पादचाऱ्यांचा मृत्यू झाला. या घटना दि. ७ रोजी घडल्या.

## मुलीच्या चुकीच्या वागण्याला कंटाळून आईची आत्महत्या

**मसूर :** अल्पवयीन मुलीच्या चुकीच्या वागण्याला कंटाळुन आईने आत्महत्या केली. मुलीच्या आईने लिहिलेल्या चिठ्ठीमुळे आत्महत्येचा प्रकार उघडकीस आला. ही घटना माळवाडी, ता. कराड येथे घडली. आईला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी वडिलांनी दिलेल्या फिर्यादीवरून अल्पवयीन मुलीसह तिला फुस लावणारा सुरज मारुती धस माळवाडी, ता. कराड या दोघांवर मसूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. संशयित सुरज धस हा फरारी आहे.

याबाबत माहिती अशी अल्पवयीन मुलगी ही संशयित सुरज याचे सोबत फोनवर बोलत असे. घरातील लोकांनी व नातेवाईकांनी वेळोवेळी तिला समजावुन सांगितले होते. फिर्यादीची आई व पत्नी या दोघींनी सुरज धस याचे घरी जावुन त्यालाही समजावुन सांगितले होते. त्यानंतरही अल्पवयीन मुलगी हीचे व सुरज याचे वागण्यात बदल होत नसल्याने फिर्यादीची पत्नी सतत त्याच गोष्टीच्या विचारात तणावात रहात होती.

ता ४ रोजी फिर्यादी सायंकाळी साडेसहा वाजण्याचे सुमारास घरी आला. त्यावेळी फिर्यादीच्या आईने पत्नी दुपारी ४ वा. पासून घरात नाही. कुठे गेली आहे? असे विचारले नंतर फिर्यादीने सगळीकडे पत्नी बाबत विचारपुस केली. ती कोठेच मिळुन आली नाही. त्यामुळे ता ५ रोजी मसूर पोलीस ठाण्यात पत्नी बेपत्ता झाले बाबत तक्रार दिलेली होती.

शोध घेत असताना गावचे पोलीस पाटील यांना गावातील तोफिक मुल्ला यांनी फोन करुन त्यांच्या मालकीच्या शेतातील विहीरीजवळ एका महिलेची चप्पल व जवळच कागदी चिठ्ठी दिसल्याचे सांगितले. फिर्यादीने चप्पल पत्नीची असल्याचे ओळखल्याने पोलीसांनी विहिरीत शोध घेतला असता तिचा मृतदेह आढळला. फिर्यादीने पत्नीचा मृतदेह ओळखला. मिळुन आलेली चिठ्ठी दाखविली. चिठ्ठीतील अक्षर हे फिर्यादीने पत्नीचेच असल्याचे ओळखले. त्यातील मजकुर वाचुन फिर्यादीने स्वतःची अल्पवयीन मुलगी व तिला फुस लावणारा सुरज मारुती धस यांच्या विरोधात फिर्यादीचे पत्नीस आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी मसूर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली अधिक तपास सपोनि विठ्ठल शेलार करत आहेत.

## ब्लँकेट विक्रेत्याने केली साडेतीन लाखाची घरफोडी

**सातारा :** साताऱ्यात घराचे कुलूप तोडून ब्लँकेट विक्रेत्याच्या कामगाराने सुमारे साडेतीन लाख रुपयांची रक्कम चोरून नेली. याप्रकरणी उत्तर प्रदेशातील कामगार विरोधात शहर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी अरशद मोहम्मदअली झोजा (वय ४०, रा. मंगळवार पेठ, सातारा. मूळ रा. कमहेडा, ता. जि. मुजफ्फरनगर, उत्तर प्रदेश) यांनी तक्रार दिली आहे. त्यानुसार शेरखान ताजअली (रा. दखेडी, ता. मुजफ्फरनगर, उत्तर प्रदेश) याच्याविरोधात गुन्हा नोंद झाला आहे. गेल्यावर्षी दि. २१ ऑक्टोबर रोजी साताऱ्यातही ही घटना घडली होती. मात्र, ही घटना घडल्यानंतर तक्रारदार गावी गेले होते. साताऱ्यात आल्यानंतर त्यांनी पोलिस ठाण्यात हा गुन्हा नोंदविला.

या प्रकरणातील अरशद झोजा हे ब्लँकेट विक्रीचा व्यवसाय करतात. त्यांच्याकडे संशयित शेरखान ताजअली कामगार होता. तक्रारदार घरी नसल्याचे पाहून त्यांच्या राहत्या घराच्या दरवाजाचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. यानंतर त्याने घरातील पिशवीत ठेवलेली ३ लाख ५० हजार ६०० रुपयांची रक्कम चोरून नेली. यामध्ये ५००, २००, १०० आणि ५० रुपयांच्या नोटा होत्या. चोरी झाल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांत तक्रार देण्यात आली.

सातारा शहर पोलिस ठाण्यात नोकर चोरीचा गुन्हा नोंद झाला आहे. याप्रकरणी पोलिस उपनिरीक्षक ढेरे हे तपास करीत आहेत.

## जाचहाट प्रकरणी पतीवर खंडणीचा गुन्हा दाखल

**सातारा :** घर खर्चासाठी पैसे मागितल्याच्या कारणावरून जाचहाट करून शिवीगाळ, दमदाटी करून मारहाण केल्याप्रकरणी पतीवर शाहूपुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सन २००८ पासून ७ मार्च २०२४ दरम्यान सौ. संगीता सर्जेराव चिकणे, रा. लक्ष्मी गोपाळ अपार्टमेंट, मंगळवार पेठ, सातारा या महिलेने पती सर्जेराव मारुती चिकणे यांना घर खर्चासाठी पैसे मागितल्याच्या कारणावरून त्यांनी वेळोवेळी तुझे तु कमव आणि घर खर्च कर. तुला देण्यासाठी माझ्याकडे पैसे नाहीत असे म्हणून वेळोवेळी शिवीगाळ, दमदटी करून लाथा बुक्क्यांनी मारहाण करून उपाशी ठेवायचे अशी तक्रार शाहूपुरी पोलीस ठाण्यात दाखल झाली आहे.

## गोडोली येथून सायकलची चोरी

**सातारा :** सातारा शहरातील गोडोलीतून सायकलची चोरी करण्यात आली आहे. याप्रकरणी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याच्या विरोधात गुन्हा नोंद झाला आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, याप्रकरणी शंकर केंजळे यांनी तक्रार दिलेली आहे. त्यानुसार दि. २ मार्च रोजी दुपारी दीड ते तीन वाजेच्या दरम्यान, गोडोलीतील एका अपार्टमेंटच्या पार्किंगमधून सायकल चोरून नेण्यात आली. या सायकलची किंमत सुमारे तीन हजार रुपये होती. सातारा शहर पोलिस ठाण्यात चोरीचा गुन्हा नोंद झाला आहे.



## कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी घेतले श्री विठ्ठल रुक्मिणी मातेचे दर्शन

**पंढरपूर :** राज्याचे कामगार मंत्री डॉ. सुरेश खाडे यांनी आज श्री विठ्ठल- रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने मंदीर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांच्या हस्ते शाल व श्री विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती देवून सत्कार करण्यात आला.

यावेळी कामगार विभागाच्या प्रधान सचिव विनिता सिंगल तसेच मान्यवर पदाधिकारी व मंदिर समितीचे कर्मचारी उपस्थित होते.

# कोरेगाव पंचायत समितीच्या प्रशासकीय इमारतीचे रविवारी मान्यवरांच्या उपस्थितीत भूमिपूजन

### २३ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर : ना. महेश शिंदे यांची माहिती

**कोरेगाव :** ग्रामीण भागाच्या विकासाचा केंद्रबिंदू असलेल्या कोरेगाव पंचायत समितीच्या नवीन प्रशासकीय इमारतीचे भूमिपूजन रविवार दिनांक १० मार्च रोजी सकाळी ११ वाजता विविध मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या इमारतीसाठी २३ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. पश्चिमात्य देशातील इमारतींच्या धर्तीवर ही अत्याधुनिक इमारत साकारली जाणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रात आदर्शवत अशी ही इमारत उभी राहणार आहे, अशी माहिती कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांनी दिली.

पंचायत समितीच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन मान्यवर नेतेमंडळींच्या हस्ते होणार असून अध्यक्षस्थान जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई हे भूषविणार आहेत. यावेळी मान्यवरांसह जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी, जिल्हा परिषदेच्या प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी या याशनी नागराजन, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले व पंचायत समितीच्या प्रशासक तथा गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण आदी मान्यवर यावेळी उपस्थित राहणार आहेत.

कोरेगाव पंचायत समितीची इमारत ही खूप जुनी असून त्यामध्ये नव्याने कोणताही तांत्रिक बदल करता येणे शक्य नसल्याने आजपर्यंत केवळ दरवर्षी डागडूजी केली जात होती. भौतिकदृष्ट्या इमारत खूप जुनी झाली होती. विविध विभागांना आणि खाते प्रमुखांना कामकाज करण्यासाठी स्वतंत्र आणि प्रशस्त जागा नसल्याने ग्रामविकास विभागाचा कारभार विस्कळीत झाला होता. शहरात विविध ठिकाणी असलेल्या वेगवेगळ्या इमारतीतून कारभार चालत असल्याने सर्वसामान्य जनतेचे मोठे हाल होत होते, ही बाब लक्षात आल्यानंतर पंचायत समितीसाठी स्वतंत्र प्रशस्त इमारत उभी करण्याचा निर्णय घेतला होता. तसा प्रस्ताव तयार करून घेतला आणि राज्य सरकारकडे सादर केला होता. मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातून ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांनी नवीन इमारतीस मान्यता दिली असून त्यासाठी २३ कोटी ५० लाख रुपयांच्या निधीची तरतूद देखील केली आहे. या इमारतीसाठी जिल्ह्याचे पालकमंत्री ना. शंभूराज देसाई यांनी विशेष पाठपुरावा केला होता, अशी माहिती त्यांनी दिली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा क्रमांक एकच्या जागेवर नव्याने पंचायत समितीची प्रशासकीय इमारत उभारली जात असून पाश्चिमात्य देशातील इमारती सारखी ही इमारत उभारली जाणार आहे. ही महाराष्ट्रातील सर्वात आदर्श अशी इमारत आहे. ग्रामविकास विभागाशी निगडित असलेले सर्व कार्यालये या इमारतीत कार्यरत राहणार असून लोकप्रतिनिधींसाठी आधुनिक दालने, वातानुकूलित सभागृहे, अधिकाऱ्यांसाठी स्वतंत्र कक्ष आणि पार्किंगसाठी प्रशस्त व्यवस्था करण्यात आली आहे.

कोरेगाव शहर आणि विधानसभा मतदारसंघाच्या वैभवात भर घालणारी पंचायत समितीची नवीन इमारत असणार आहे. सध्या कोरेगाव शहरात कोट्यवधी रुपयांची विकास कामे मार्गी लागली आहेत. आझाद चौकातील भाजी मंडई संकुल आणि शासकीय विश्रामगृहाची नवीन इमारतीची उभारणी सुरू असून पंचायत समिती इमारतीमुळे सर्वसामान्य जनतेची कामे एका झटक्यात मार्गी लागणार आहेत, असेही ना. महेश शिंदे यांनी सांगितले.

कोरेगाव विधानसभा मतदारसंघातील सामान्यातील सामान्य माणसाचा विचार करून नवीन इमारत उभी करण्याचा निर्णय घेतला आहे. पंचायत समिती इमारतीच्या भूमिपूजन सोहळ्यासाठी मान्यवर पदाधिकारी व शासकीय अधिकारी उपस्थित राहणार असून ते कोरेगाव तालुक्यातील सामान्य जनतेशी थेट संवाद साधणार आहेत. या कार्यक्रमास कोरेगाव तालुक्यातील विविध गावचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विकास सोसायटीचे चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन ना. महेश शिंदे यांनी केले आहे.

माजी पदाधिकारी सदस्यांचा होणार विशेष गौरव

कोरेगाव पंचायत समितीच्या गौरवास्पद वाटचालीमध्ये योगदान देणाऱ्या कोरेगाव तालुक्यातील पंचायत समितीचे माजी सभापती, उपसभापती व सदस्यांचा या कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून विशेष गौरव करण्यात येणार आहे. कोरेगाव तालुक्यातील सर्व माजी पदाधिकारी व पंचायत समितीच्या माजी सदस्यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.



### साखरवाडीतील श्री सिद्धेश्वर मंदिर भाविकांचे

## श्रद्धास्थान पर्यावरण व्यवस्थापक सचिन गणपत भोसले

**साखरवाडी :** साखरवाडी येथील श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये सालाबाद प्रमाणे या वर्षी महाशिवरात्री उत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी पिंपळवाडी येथील माऊली प्रसादिक भजनी मंडळाचा गायनाचा कार्यक्रम झाला त्याबद्दल भजनी मंडळातील गायक मंडळींचा सत्कार करताना साखरवाडी येथील श्री दत्त इंडिया साखर कारखान्याचे पर्यावरण व्यवस्थापक सचिन गणपत भोसले व साखरवाडी तंटामुक्ती समितीचे माजी अध्यक्ष पैलवान महेश भोसले यांच्या हस्ते करण्यात आला यावेळी सचिन गणपत भोसले यांनी या महाशिवरात्री सोहळ्याप्रसंगी बोलून दाखवले सचिन भोसले व पल्लवी भोसले या उभयतांच्या हस्ते मंदिरातील महाशिवरात्री निमित्त आरती घेण्यात आली तत्पूर्वी माऊली प्रसादिक भजनी मंडळाच्या गायनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता यावेळी माऊली प्रसादिक भजनी मंडळातील पोपटराव भोसले वसंतराव हवालदार विठ्ठल हवालदार बाळासाहेब महादेव भोसले भगवान जाधव दत्ता खेसे हरिदास काटकर इत्यादी उपस्थित होते या महाशिवरात्री उत्सवामध्ये सचिन भोसले यांचे नेहमी सहकार्य असल्याचे या सोहळा समितीचे मुख्य आयोजक राजेंद्र ज्ञानदेव पवार यांनी सांगितले मंदिरामध्ये महाशिवरात्री निमित्त पहाटे अभिषेक, पूजा दुपारी व संध्याकाळी महाआरती व आलेल्या हजारो भाविकांना उपवासाच्या पदार्थांचे वाटप करण्यात आले होते यासाठी साखरवाडी येथील ओंकार स्वीटचे मोठे सहकार्य लाभले असल्याचे सांगितले

किशोर जगताप बबलू बारगळे दादा जाधव सावंत, लोखंडे व उत्सव समितीचे सर्व कार्यकर्त्यांनी उत्सव व्यवस्थित पार पडण्यासाठी श्रमदान दिले यावेळी भाव भक्तांची सिद्धेश्वराचे दर्शन घेण्यासाठी मोठ्या प्रमाणात रांग लागली होती विशेषता यावेळी महिला वर्गांची मोठी उपस्थिती होती.

# वाईतील मित्र मैत्रिणीचे अहमदाबादमध्ये गेट टूगेदर

### ५२ वर्षापासूनचे मित्र दरवर्षी येतात एकत्र;हे २६ वे वर्ष..वयाचा सत्तरीतही मित्रांसाठी अन मैत्रीसाठी कधी पण अन कुठे पण यायची तयारी

वाई : शालेय शिक्षणानंतर कॉलेजमध्ये एकत्र आलेल्या नव्या सवंगड्यानी आपापल्या शाळेतल्या खास मित्रांची नव्या कॉलेजच्या मित्रांशी नाळ जोडली. गेली ५२ वर्षे ही दोस्त मंडळी आपल्या मैत्रीचा ओलावा टिकवून आहेत. सुख दुःखात एकमेकांना साथ देताहेत, भेटल्यावर गप्पांची मैफिल झोडताहेत. नुकतीच त्यांनी अहमदाबाद गुजरातमध्ये तब्बल २६ वे तीन दिवसीय 'गेटटूगेदर' एन्जॉय केले. वयाच्या 'सत्तरी'कडे झुकूनही फ्रेंडशिप जपणाऱ्या या जुन्या जाणत्या मित्र मैत्रिणींचे 'मैत्र' मैत्रीसाठी अनुकरणीय..

दुःख अडवायला उंबऱ्यासारखा, मित्र वनव्यामध्ये गारव्यासारखा...! मैत्रीचा हा बंध हा आयुष्यातील सर्वात घट्ट बंधनांपैकी एक आहे. आपल्या कुटुंबाइतकेच आपल्या आयुष्यात खास स्थान असणार्या काही व्यक्ती म्हणजे आपले बेस्ट फ्रेंड्स. आयुष्याच्या वेगवेगळ्या टप्प्यांवर आपल्याला आपापल्या क्षेत्रात वेगवेगळे लोक भेटतात, आपले सूर जुळले की त्यांची आपली मैत्री वाढत जाते. वेगवेगळ्या क्षेत्रातील वेगवेगळे मित्र बनतात जसे मॉर्निंग वॉकचे वेगळे मित्र तसे रात्री पार्टीसाठीचे वेगळे मित्र. आपल्या कामाच्या स्वरूपानुसार आपले मित्र बनतात, बदलतात, वाढतात, कमी होतात. पण चिरकाल टिकतात ते शाळेतील मित्र!!त्यांचं अन आपलं मैत्रीचं नातं निरागस, निस्वार्थी अन निखळ असत. त्यामुळे हृदयाच्या एका कप्प्यात त्या मैत्रीच्या आठवणींचा ठेवा चिरकाल जतन केलेला असतो. पुढील शिक्षण, नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने या मैत्रीत खंड पडतो पण त्यातील ओलावा कधीच कमी होत नाही. हा ओलावा चिरंतन तजेलदार ठेवण्याचे काम काही मित्रमंडळी सातत्याने करतात.

वाई येथील द्रवीड हायस्कूल वाई, कन्या शाळा, त. ल. जोशी विद्यालय वाई आणि बावधन हायस्कुल बावधन यांच्या सन १९७१ च्या 'एसएससी' बॅचने गेली २६ वर्षे स्नेहसंमेलनाच्या माध्यमातून ही मैत्री जपलीय. १९७१ च्या या बॅचच्या विद्यार्थी व विद्यार्थिनींचे २६ वे स्नेहसंमेलन दिनांक २७ फेब्रुवारी ते १ मार्च नुकतेच अहमदाबाद येथे पार पडले. तब्बल ५२ वर्ष मैत्री टिकवून ठेवलेल्या या मित्र मैत्रिणींचे परराज्यात स्नेह संमेलन करण्याचे स्वप्न यावर्षी पूर्ण झाले. नोव्हेंबर २०२३ मध्येच रेल्वे प्रवास, लॉजींग, जेवण, नाश्ता व प्रवास याचे पूर्ण नियोजन केल्यानंतर एकूण ३९ जण या संमेलनात सहभागी झाले. यातील काही मित्र सपत्नीक आले होते. संमेलनात प्रमोद गर्गे यानी अहमदाबादमधील स्टॅच्यू ऑफ युनिटी, माता वैष्णो देवी मंदीर, आशियातील सर्वात मोठे गणेशाकार मंदीर, गांधी आश्रम ही प्रेक्षणीय ठिकाणे दाखवून सर्वांचा आनंद द्विगुणित केला. गणपत जायकर यांनी सुत्रसंचालन केले तसेच सतिश शेंडे यांनी समारोप आणि आभार मानले.

३९ मित्र मैत्रिणी तीन दिवस आपल्या बालपणात हरवून गेल्या होत्या. जेवणानंतर जमलेल्या मैफिलीत सतीश शेंडे यांनी एकांकिका सादर केली. अनिल कुलकर्णी यांनी सुंदर गाणी सादर केली. सौ. जोशी यांनी कथा वाचन केले. सुदाम जमदाडे यांनी संमेलनाचा प्रवास कथेच्या रुपात सादर केला. गणपत जायकर यांनी सुरेल गवळण सादर केली. प्रत्येकाने आपापले वर्षभरातील धमाल किस्से गोड आठवणी विशद केल्या.काही सुखद आणि काही दुःखद घटनाही या सवंगड्यानी मनमोकळ्यापणाने मांडल्या.

फिर मिलेंगे.. मिलतेही रहेंगे..!असा मैत्रीचा सूर आवळत 'सत्तरी'कडे झुकलेली पण मनाने आणि मैत्रीसाठी 'चिरतरुण' असलेली पोरं पुढच्या या भेटीच्या आनंदात पुढच्या भेटीच्या

## अवैध धंदे, प्रकार, वाहतुक कोंडी

# रोखण्याचे नव्या अधिकार्यांसमोर आव्हान

**म्हसवड :** म्हसवड पोलीस स्टेशन चे नूतन अधिकारी म्हणुन स.पो.नि. बिराजदार यांनी पदभार स्विकारताच धडाकेबाज कारवाया करीत पोलीस स्टेशन हद्दीतील गावठी दारु बनवणारे अड्डे उध्दवस्त करीत काहींच्या मुसक्या आवळल्या आहेत, बिराजदार यांची ही कामगिरी जरी दिमाखदार असली तरी त्यांच्यासमोर म्हसवड पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व अवैध धंदे, अवैध प्रकार, खुलेआम सुरु असलेले जुगार अड्डे, वाहतुक कोंडी, गँगवॉर, चोर्या, दहशत निर्माण करणारे गावगुंड, मुलींचे छेडछाडीचे प्रकार,अल्पवयीन चालकांचा सुळसुळाट आदी प्रमुख आव्हाने उभी ठाकली असुन ही आव्हाने स.पो. नि. बिराजदार कशी मोडीत काढतील असा सवाल सामान्य म्हसवडकर विचारत आहे.



सातारा जिल्ह्यातील शेवटचे शहर म्हणुन म्हसवड शहराची ओळख असली तरी हे शहर सांगली व सोलापुर जिल्ह्याच्या सिमेवर येत असल्याने या शहरात खरे तर अवैध धंद्याना अक्षरशा उत आला आहे. जिल्ह्यातील शेवटचे शहर असल्याने याठिकाणी इतर शासकीय कार्यालयातील अधिकारी याठिकाणी हजर राहण्यास आजवर टाळाटाळ करीत आल्याची वस्तुस्थिती आहे, मात्र पोलीस स्टेशन ला अधिकारी म्हणुन येण्याची जणु स्पर्धाच लागलेली आजवर दिसुन आलेली आहे, एकतर हे शेवटचे टोक त्यात दोन लगतच्या मालदार जिल्ह्याच्या सिमा अन् त्यामुळे सुरु असलेले अवैध प्रकार यामुळे मिळकतीचे मोठे कार्यक्षेत्र या पोलीस स्टेशन ला लाभल्याने अनेकदा येथेच आपली वर्णी लागावी यासाठीही वरीष्ठांकडे अधिकारीवर्गातुन लॉबींग सुरु असल्याचे यापुर्वी पहावयास मिळाले आहे. म्हसवड शहर हे तसे माण तालुक्यातील सर्वात मोठे शहर आहे या शहरावर परिसरातील १२ वाड्या १२ वस्त्यांचा उदर निर्वाह अवलंबुन आहे त्यामुळे शहरात सतत वाहतुकीची मोठी वर्दळ सुरु असते, तर याच शहरात राज्यातील सुप्रसिद्ध असे श्री. सिध्दनाथ व माता जोगेश्वरी देवीचे हेमाडपंथी प्राचीन असे भव्य मंदिर ही आहे हे मंदिरच शहराची मुख्य ओळख आहे, या मंदिरात राज्यासह, राज्याबाहेरील भाविकांची सतत रेलचेल सुरु असते, या मंदिरात येणार्या भाविकांची संख्या मोठी असल्याने शहरात अनेकदा वाहतुक कोंडी होत असल्याचे चित्र आहे, अशातच शहरातील मुख्य पेठ ही अतिशय अरुंद असल्याने या पेठेतील वाहतुक कोंडी ही नित्याचीच बनली आहे. ही वाहतुक कोंडी खरे तर अनेकदा म्हसवडकरांची डोकेदुखी ठरली असली तर अद्यापही त्या डोकेदुखीवर कोणत्याही पोलीस अधिकार्याने कायद्याचा बाम लावला नसल्याने ही कोंडी फुटलेली नाही.

शहरावर परिसरातील जनजिवन अवलंबुन असल्याने परिसरात ढाबा संस्कृती जोर धरु लागल्याचे चित्र असुन हे ढाबे नशेबाजीचे अड्डे बनले आहेत, अनेक रोडलगतचे ढाबे हे समांतर बीअरबार बनल्याची वस्तुस्थिती असुन हे भांडण- तंड्यांचे केंद्र बनले आहेत. शहरात कोणता असा अवैध धंदा नाही जो केला जात नाही मात्र त्यावर निर्बंध कोण लावणार असा प्रश्न असल्याने ते बोकाळले आहेत. हिरोगिरी करणार्या तरुणांनी तर शहरात अक्षरशा उच्छांद मांडला असुन आपणाला कोणी रोकणारा ना कोणी टोकणारा अशा लाईफ स्टॉईलमध्ये ही तरुणाई गुरफटल्याचे चित्र आहे, त्यामुळे गल्लोगल्ली बाईकस्वारांचा धुम स्टाईल धुडगुस सुरु आहे, अशातच अल्पवयीन बाइकस्वारांनी डोके वर काढण्यास सुरुवात केली आहे यालाही आळा घालणे गरजेचे आहे.

शहरातील अनेक ठिकाणी राजरोसपणे जुगारीचे अड्डे सुरु आहेत यातुन काही प्रशासकीय इमारतीसुध्दा सुटु शकल्या नाहीत दिवसा ढवळ्या सुरु असलेले हे प्रकार पाहुन शहरात कायदा सुव्यवस्था आहे की नाही असा प्रश्न सामान्यांना पडल्यावाचुन रहात नाही. शहरातील कायदा सुव्यवस्था अबादीत राहण्यासाठी आता पोलीस अधिकार्यांनीच कायदा काय असतो हे जरा कायदा धाब्यावर बसवणार्यांना दाखवुन देण्याची वेळ आली असुन शहरात हा बदल नुतन पोलीस अधिकारी बिराजदार करुन दाखवतील अशी अपेक्षा सामान्य जनतेतुन व्यक्त होत



विजय लावंड यांच्याकडे देणगी सुपूर्द करताना दशरथ आबा बोबडे शेजारी ग्रामस्थ.

### महाशिवरात्री निमित्त खिचडी व दूध वाटप

# गोपालन संस्थेला ५१ हजार रुपयांची देणगी

**फलटण :** फलटण - सातारा रस्त्यावर घाडगेवाडी, ता. फलटण येथे प्रतिवर्षी महाशिवरात्री निमित्त तेथील शिवमंदिरात घाडगेवाडी व परिसरातील भजनी मंडळांच्या माध्यमातून अखंड भजन सेवा सुरु असते, त्याचवेळी गावातील आणि पंचक्रोशीतील अबालवृद्ध भाविक श्रध्देने अगदी रांगेत, शिस्तीने शंभू महादेवाचे दर्शन घेतात, यामध्ये महिलांची संख्या अधिक असते.

महाशिवरात्री निमित्त ग्रामस्थांच्यावतीने येणाऱ्या सर्व भाविकांना खिचडी व मसाला दूध वितरीत करण्यात येते, या खिचडी व दूध वितरणाचे वैशिष्ट्य म्हणजे घाडगेवाडी येथील ग्रामस्थ फलटण - सातारा रस्त्याने जाणाऱ्या सर्व वाहनांना अगदी एस. टी. बसेस सुध्दा थांबवून त्यामधील प्रवाशांना खिचडी व दूध प्रसाद म्हणून वाहनापर्यंत नेऊन देतात, प्रवासीही भक्ती भावाने या प्रसादाचा स्वीकार करतात. ही प्रथा गेल्या अनेक वर्षांपासून अखंडित सुरु आहे.

पिंप्रद, ता. फलटण येथे युवक मित्र ह.भ.प. बंडा तात्या कराडकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आलेल्या श्रीकृष्ण गोपालन व संशोधन संस्थेला प्रगतशील शेतकरी व उद्योजक दशरथ शामराव बोबडे तथा आबा हे प्रतिवर्षी ५१ हजार रुपयांची देणगी देतात, प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही शिवमंदिरात सुरु असलेल्या भजन व दर्शन सेवेदरम्यान भाविकांच्या उपस्थितीत संस्थेचे सचिव विजय लावंड यांच्याकडे दशरथ आबा यांनी सदर देणगी सुपूर्द केली.

# आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या मागणीनुसार स्थानिकांना प्राधान्य देणार

## मुख्यमंत्री शिंदे; मुनावळे येथील वॉटर स्पोर्ट जलपर्यटन केंद्राचा शुभारंभ

**सातारा :** कोयना बॅक वॉटर, शिवसागर जलाशयात जागतिक दर्जाचे जलपर्यटन, वॉटर स्पोर्ट सुरु झाले आहे. एमटीडीसीद्वारे सुरु होत असलेला देशातील असा एकमेव प्रकल्प असून यामुळे या भागातील पर्यटनाला चालना मिळणार आहे. या जलपर्यटन केंद्रावर स्थानिक लोकांना रोजगाराची संधी मिळाली पाहिजे अशी सूचना या भागाचे आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली आहे. आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या सूचनेनुसार याठिकाणी स्थानिकांना प्राधान्य दिले जाईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री ना. एकनाथ शिंदे यांनी दिली.

मुनावळे ता. जावली येथे आ. शिवेंद्रसिंहराजेंच्या अथक पाठपुराव्यानंतर शिवसागर जलाशयात जागतिक दर्जाचे जलपर्यटन केंद्र मंजूर करण्यात आले




**मुनावळे ता. जावली येथे जलपर्यटन, वॉटर स्पोर्ट केंद्राचे भूमिपूजन करताना ना. एकनाथ शिंदे, ना. उदय सामंत, ना. शंभूराज देसाई, आ. श्रीमंत छ. शिवेंद्रसिंहराजे भोसले, आ. मकरंद पाटील, नाना पाटेकर व मान्यवर...**

आहे. या वॉटर स्पोर्ट, जलपर्यटन केंद्राचा शुभारंभ ना. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते आणि उद्योगमंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभूराज देसाई, आ. शिवेंद्रसिंहराजे, आ. मकरंद पाटील, नाना पाटेकर आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आला. यावेळी ना. शिंदे बोलत होते.

ना. शिंदे म्हणाले, मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जलपर्यटन केंद्र सुरु झाल्याने या भागात पर्यटनवाढीला मोठी चालन मिळणार आहे. येथील विविध प्रकारचे प्रश्न आ. शिवेंद्रसिंहराजेंनी मांडले असून ते सोडवण्यासाठी निश्चितच सकारात्मक निर्णय घेतला जाईल. या भागात सुरु असलेल्या रस्ते आणि मोठ्या पुलांच्या कामामुळे येथून थेट कोकणात जाता येणार असून पर्यटकांच्या वेळेची आणि इंधनाची बचत होणार आहे.

आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले, जलपर्यटन केंद्रामुळे या भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे. महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून हा प्रकल्प सुरु करण्यात आला असला तरी, याठिकाणी स्थानिकांना रोजगार मिळाला पाहिजे. स्थानिक लोक रोजीरोटीसाठी मुंबईला जात असतात. हे चित्र बदलावे यासाठीच या भागात पर्यटनवाढीला चालना देणे, विविध प्रकल्प आणणे यासाठी प्राधान्य देत आहे. मुख्यमंत्री हे या भागाचे सुपुत्र आहेत, त्यांनी स्थानिकांना प्राधान्य देऊन या भागाचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी सहकार्य करावे, असे आ. शिवेंद्रसिंहराजे म्हणाले.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य राजू भोसले, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक ज्ञानदेव रांजणे, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक श्रद्धा जोशी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधीक्षक समीर शेख, जलसंपदा विभागाचे अधीक्षक अभियंता जयंत शिंदे यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी, मुनावळे, बामणोली, शेंबडी, तापोळा आदी भागातील पदाधिकारी, विविध गावचे सरपंच आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

# बिल्डर्स असोसिएशनच्या घरकुल मेळाव्याचा शानदार शुभारंभ

### सातारकरांना एकाच ठिकाणी मिळणार कमर्शिअल प्रोजेक्ट्ची माहिती व बुकींग सुविधा

**सातारा :** बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडिया या बांधकाम विश्वातील सर्वोच्च संस्थेच्या सातारा शाखेतर्फे आयोजित केलेल्या घरकुल मेळाव्याचा शानदार शुभारंभ स्टेट बँक ऑफ इंडियाच्या चीफ क्रेडीट मॅनेजर आकांक्षा भुमिवाल यांच्या हस्ते व कंग्राळकर असोसिएटस्चे प्रमुख श्रीधर कंग्राळकर, बिल्डर्स असोसिएनश ऑफ इंडिया महाराष्ट्र स्टेट चेअरमन सचिन देशमुख व बीएआय चे अध्यक्ष अनिल दातीर, सेक्रेटरी कौस्तुभ मोरे, , उपाध्यक्ष सुधीर ठोके, खजिनदार हर्षद वालावलकर व पदाधिकार्यांच्या उपस्थितीत पार पडले .

यावेळी बोलताना स्टेट बँक ऑफ इंडियाच्या आकांक्षा भुमीवाल म्हणाल्या की स्टेट बँक व बीएआय यांचे अतूट नाते निर्माण झाले आहे. बीएआय नेहमीच विविध उपक्रमांमधून आपले वैविध्य जपत आले आहे. घरकुल मेळाव्याच्या आयोजनामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी घरांचे पर्याय उपलब्ध झाले आहेत. यावेळी कंग्राळकर असोसिएटस्चे श्रीधर कंग्राळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना घरकुल मेळाव्याला शुभेच्छा दिल्या व अशा प्रकारचे प्रदर्शन अन्य शहरात देखील बीएआय सातारा सेंटरने आयोजित करावे असे मनोगत व्यक्त केले.

आपल्या घराचे स्वप्न साक्षात पूर्ण करणार्या घरकुल मेळाव्याचे आयोजन बिल्डर्स असोसिएशन सातारा शाखेतर्फे दि. ८, ९ व १० मार्च २०२४ रोजी अलंकार हॉल, पोलीस करमणुक केंद्र येथे सकाळी १० ते रात्री ९ वाजेपर्यंत करण्यात आले आहे.

यावेळी बोलताना बीएआयचे स्टेट चेअरमन सचिन देशमुख म्हणाले की, बिल्डर्स असोसिएशन ऑफ इंडियाची सातारा शाखा नेहमीच आपल्या अनोख्या उपक्रमांनी भारतभर कौतुकास्पद पात्र ठरते आहे. बीएआय सातारा शाखा केवळ आपल्या सभासदांसाठीच नव्हे तर अनेक सामाजिक उपक्रमही वर्षभर राबवित असते. घरकुल मेळाव्याला सातारकर नागरिक उत्स्फूर्त प्रतिसाद देतील असा विश्वास सचिन देशमुख यांनी यावेळी व्यक्त केला.

यावेळी बोलताना सातारा सेंटरचे अध्यक्ष अनिल दातीर म्हणाले की, घरकुल मेळाव्यात ५० स्टॉल्स असून सातारा जिल्हा व अन्य ठिकाणचे नामवंत बिल्डर्स, डेव्हलपर्स, वित्तीय संस्था व अन्य साहित्याचे स्टॉल्स् यामध्ये सहभागी झाले आहेत. घरकुल मेळाव्यात तुमच्या बजेट व लोकेशन नुसार सर्व पर्याय उपलब्ध असणार आहेत. त्वरीत कर्ज सुविधाही अनेक वित्तीय संस्थांतर्फे मिळणार आहेत. सातारा शहरातील सर्व नामवंत बिल्डर्स या मेळाव्यात सहभागी झाले असून सातारा शहराच्या चारही दिशांचे रेसिडेन्सीअल, कमर्शिअल तसेच प्लॉटींग प्रकल्पांची माहिती एकाच छताखाली सातारकरांना उपलब्ध होणार आहे. घरकुल मेळाव्याला भेट देऊन आजच आपल्या स्वप्नातील घराचे स्वप्न प्रत्यक्षात उतरवा असे आवाहन असोसिएशनचे अध्यक्ष अनिल दातीर यांनी यावेळी केले.

प्रमुख पाहुण्यांचा सत्कार बिल्डर्स असोसिएशनच्या वतीने अध्यक्ष अनिल दातीर, उपाध्यक्ष सुधीर ठोके, सेक्रेटरी कौस्तुभ मोरे,, खजिनदार हर्षद वालावलकर यांनी केला. पहिल्या दिवसापासूनच घरकुल मेळाव्याला सातारकरांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शंभुराज पाटील यांनी केले तर आभारप्रदर्शन कौस्तुभ मोरे यांनी केले.

# कुरुंदवाड पोलिसांनी पकडले संशयित

**कुरुंदवाड :** दुचाकी, चारचाकी वाहनासह भुरट्या चोरी करणाऱ्या पाच चोरट्यांना कुरुंदवाड पोलिसांनी साफळा रचून रंगेहाथ पकडले. त्यामध्ये दोन अल्पवयीन मुलांचा समावेश आहे. त्यांच्याकडून एक मारुती चारचाकी गाडी, टेम्पो, दोन मोटारसायकली, गॅस सिलेंडर टाकी व स्क्रॅप साहित्य असे सुमारे ७ लाख २६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. शिवतेज दिपक पुजारी (रा. हेरवाड, ता. शिरोळ), विकास कुमार कांबळे (रा. तेरवाड), विनोद सुरेश गोसावी (रा. यड्राव फाटा, यड्राव) व दोन अल्पवयीन मुले अशी संशयित आरोपींची नावे आहेत. जिल्हा पोलिस अधीक्षक महेंद्र पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस यांच्या पथकाने ही कारवाई केली.



पोलिसांतून मिळालेल्या माहितीनुसार कुरुंदवाड पोलिस ठाण्याच्या हद्दीत गेल्या चार दिवसांपासून भुरट्या चोरीचे प्रमाण वाढले होते. त्यामुळे पोलिसांची डोकेदुखी वाढली होती. या चोरट्यांना गजाआड करण्याचे पोलिसांसमोर मोठे आव्हान होते. त्यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक फडणीस यांनी रात्रीच्या गस्तीसाठी विशेष पथक नेमले होते. शुक्रवारी (दि. ८) रोजी गोपनीय माहितीनुसार पथकाने पेट्रोलिंग करीत हेरवाड हद्दीत पाच मैल रस्त्यावर पाच संशयितांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून कसून चौकशी केली असता चोरीची कबुली दिली.

पोलिसांच्या या कारवाईने गुन्हेगारांचे धाबे दणाणले असून भुरट्या चोरांना गजाआड केल्याने पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रविराज फडणीस, पोलिस उपनिरीक्षक सागर पवार यांच्यासह त्यांच्या पथकाचे कौतुक होत आहे.

पोलिस पथकात विवेक करडे, ज्ञानदेव सानप, बाळासो कोळी, शहाजी फोंडे, संतोष साबळे, अरुण नागरगोजे, सागर खाडे, फारुख जमादार, नागेश केरीपाळे, बाबजी दराडे, सचिन पुजारी यांचा समावेश होता.

### नायगाव येथे आज सत्यशोधक समाजाचे राज्यस्तरीय पहिले महिला अधिवेशन

**खंडाळा :** खंडाळा तालुक्यातील क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे जन्मगाव असलेल्या नायगाव याठिकाणी सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्ण वर्षपूर्ती व ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त सत्यशोधक समाज संघ व सत्यशोधक समाज महिला संघाच्यावतीने रविवार दि.१० मार्च रोजी सकाळी ९ वाजता जिल्हा परिषद प्राथमिक शाळेसमोर राज्यस्तरीय महिला राज्य अधिवेशनाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अध्यक्ष अरविंद खैरनार,सचिव सुरेश झाल्टे,स्वागताध्यक्षा नायगाव सरपंच साधना नेवसे यांनी प्रसिद्धिपत्राद्वारे दिली आहे. या पहिल्या महिला रुपाली चाकणकर यांच्या हस्ते होणार आहे.

# सर्वच परवाने व दाखल्यांची कार्यालयातून तपासून घ्यावेत : समीर शिंगटे

## प्रांतधिकारी पन्हाळ्यात बोगस सही शिक्यांच्या प्रकरणी पत्रकार परिषद

**पन्हाळ :** पन्हाळा उपविभागातील पन्हाळा व शाहूवाडी तालुक्यातून घेतलेल्या बांधकाम परवाने, बिगरशेती आदेश,सर्वच प्रकारचे जातीचे दाखले पक्षकारांनी आपले परवाने, दाखले तहसील व प्रांत कार्यालयातून तपासून घ्यावेत. त्यामध्ये परवाने अगर दाखले बोगस आढळले तरी त्याबाबत फसवणूक झालेल्या पक्षकारांना



दोषी ठरवले जाणार नाही. अशी ग्वाही पन्हाळा प्रांतधिकारी समीर शिंगटे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

पुढे बोलतांना ते म्हणाले,तपासणीत दाखला अथवा परवाना बोगस मिळालेले पक्षकार दोषी नसतात. त्यांची असे बोगस परवाने,दाखले देऊन फसवणूक झाली असते.त्यामुळे फसवणूक झालेल्या पक्षकारांनी दाखला ज्याचे कडून घेतला त्या महा ई सेवा केंद्राचे अथवा एजेंटाबाबत न भिता माहिती दिली पाहिजे. त्या आधारेच आम्हास दोषीपर्यंत पोहचता येईल.व त्याला शासन करता येईल व त्यांची टोळी प्रकाशात आणण्यासाठी मदत होईल. साध्या चर्चेत असलेले प्रकरण फक्त बोगस बांधकाम परवान्या पुरतेच मर्यादित राहिलेले नाही. त्याकामी दाखल केलेल्या गुन्ह्याच्या पोलीस तपासात विविध प्रकारचे दाखलेही बोगस असलेचे उघडकीस आले आहेत. त्यामध्ये जातीचे ,नॉन क्रिम्लिअर,बिगरशेती आदेशासाठी लागणारे दाखले व जात पाडताळणी दाखल्यांचा देखील समावेश आहे.आत्तापर्यंत केलेल्या तपासणीत १८ कुणबी जातीचे दाखले आढळले आहेत. तर एका जात पडताळणी दाखल्याची पडताळणी चालू आहे.या पार्श्वभूमीवर महा ई केंद्र तपासणी चालू केली आहे. पण या बोगस गिरी प्रकरणात दोन्ही तालुक्यात मोठी टोळी कार्यरत असण्याची शक्यता निर्माण झाली आहे.त्यामुळे ती टोळी प्रकाशात आणण्यासाठी जनतेतूनही सहकार्य अपेक्षित आहे. त्यासाठी ज्यांनी जातीचे अगर अन्य दाखले अथवा परवाने घेतले असतील त्यांनी त्याची सत्यता पडताळून घेणे गरजेचे आहे.या पत्रकार परिषदेला तहसीलदार माधवी शिंदे -जाधव निवासी नायब तहसीलदार संजय वळवी उपस्थीत होते.

चालू बोगस गिरी प्रकरणात चार आरोपी अटकेत आहेत. तर एक महा ई सेवाचालक अद्याप फरार आहे.त्याचे ताब्यातील व वापरातील सर्व साहित्य ताब्यात घेतले असून त्याची पडताळणी चालू आहे.

# विमानाचे इंधन चोरणाऱ्या टोळीला

# पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या

**वडगाव मावळ :** मुंबई येथून पुणे विमानतळावर विमानाचे इंधन वाहतूक करणाऱ्या टँकर मधून इंधन चोरणाऱ्या टोळीला पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या गुन्हे शाखेने बेड्या ठोकल्या. सोमाटणे टोल नाक्याजवळ असलेल्या एका हॉटेलच्या परिसरात हा काळा बाजार सुरु असताना पोलिसांनी कारवाई करत पाच जणांना रंगेहाथ पकडले आहे. ही कारवाई बुधवारी (दि. ६) करण्यात आली आहे.

मंगेश सखाराम दाभाडे (वय ४२, रा. तळेगाव दाभाडे), इलाही सैफन फरास (वय ४५, रा. धानोरी, पुणे), अनिल सतईराम जस्वाल (वय २८, रा. उत्तर प्रदेश), अमोल बाळासाहेब गराडे (वय ३१, रा. पिंपळखुटे, ता. मावळ), परशुराम उर्फ सोन्या धोंडीबा गायकवाड (वय ३६, रा. चऱ्होली खुर्द, ता. खेड) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत.



पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमाटणे टोल नाक्याजवळ शांताई हॉटेलच्या परिसरात विमानाला लागणारे इंधन (एटीएफ/जेट इंधन) टँकर मधून काढून त्याची विक्री करण्याचा काळा बाजार सुरु असल्याची माहिती गुन्हे शाखा युनिट चारला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा मारून कारवाई केली. जागा मालक मंगेश दाभाडे याने टँकर चालकालाही आणि अनिल या दोघांशी संगनमत करून अमोल आणि परशुराम याच्या मदतीने टँकर मधून जेट इंधन काढून घेत असताना त्यांना पोलिसांनी पकडले.

आरोपींकडून १५४० लिटर एटीएफ/जेट इंधन, रिकामे प्लास्टिक कॅन, लोखंडी टॉमी, इंधन मोजण्यासाठी लागणारी लोखंडी पट्टी असा एकूण एक लाख ६५ हजार २०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.आरोपी मंगेश दाभाडे याच्यावर सन २००८, सन २०१६ आणि सन २०१९ मध्ये दारूबंदी कायद्यान्वये चार तसेच सन २०२२ मध्ये मारहाण केल्याचा एक असे पाच गुन्हे दाखल आहेत.

अशी व्हायची इंधनाची चोरी

जेट इंधन भरलेले टँकर नवी मुंबई येथील जेएनपीटी बंदरातून पुणे विमानतळावर येत असतात. टँकर मध्ये इंधन भरताना इंधनाच्या पृष्ठभागावर फेस येतो. त्याच वेळी टँकर मधील इंधनाची मोजणी केली जाते. टँकर जेंव्हा पुणे विमानतळावर येतो तेंव्हा फेस कमी झालेला असतो त्यामुळे त्याची पातळी कमी दाखवली जाते. या तांत्रिक अडचणीचा फायदा आरोपींनी घेतला. हजारो लिटर इंधन भरलेल्या टँकर मधून अवघे ७० ते ८० लिटर इंधन काढून घेतल्यास कोणालाही संशय येत नसे. हे इंधन आरोपी काळ्या बाजारात चढ्या दराने विकत असत.

ही कारवाई पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे, अपर पोलीस आयुक्त वसंत परदेशी, पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे, सहायक पोलीस आयुक्त सतीश माने यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संतोष पाटील, सहायक निरीक्षक संतोष पाटील, उपनिरीक्षक धनराज किरनाळे, सहायक फौजदार नारायण जाधव, संजय गवारे, प्रवीण दळे, तुषार शेटे, मोहम्मद गौस नदाफ, सुरेश जायभाये, वासुदेव मुंडे, प्रशांत सैद, गोविंद चव्हाण, सुखदेव गावंडे यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांनी शेतातील मातीचे मूल्य ओळखणे गरजेचे

## ऊस शास्त्रज्ञ आबासाहेब साळुंखे यांचे प्रतिपादन

**शिरोळ :** शेतकऱ्यांनी शेतातील मातीचे मूल्य ओळखून तिचे संगोपन केल्यास अधिक उत्पादन देण्यास माती केव्हाही तयार असते तेव्हा मातीला समजून घेतले पाहिजे शेती संशोधक व तज्ञांच्या सल्ल्यानुसार शेती केल्यास शेतकऱ्यांना चांगले दिवस येतील असे प्रतिपादन व्हि .एस.आय पुणे येथील माजी ऊस शास्त्रज्ञ आबासाहेब साळुंखे यांनी येथे बोलताना केले

शिरटी ता. शिरोळ येथील जैन सांस्कृतिक भवन शिरटी येथे शिरटी किसान विविध कार्यकारी सहकारी विकास सेवा संस्थेच्या ७५ व्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त शाश्वत ऊस शेती मार्गदर्शन शिबिरात श्री साळुंखे बोलत होते अध्यक्षस्थानी प्रगतशील शेतकरी कल्लाप्पा खवाटे हे होते



आबासाहेब साळुंखे अधिक माहिती देताना म्हणाले मातीचे लाईफ वाढवणे गरजेचे आहे मातीवरच शेती उत्पादन शक्य आहे मातीचा वास म्हणजे श्वास आणि ऑक्सिजन आहे माती परीक्षण करून शेतीची मशागत केली पाहिजे शेतातील माती कायम जिवंत ठेवली पाहिजे मातीकडे दुर्लक्ष करून भरम साठ पाणी आणि खताचा डोस देऊन काही साध्य होणार नाही असे सांगून ते म्हणाले शेतीला सेंद्रिय खता शिवाय पर्याय नाही किती रासायनिक खताचा मारा केला तरी सेंद्रिय खताचा डोस आवश्यक आहे खड्ड्यामध्ये खत तयार करणे फायदेशीर ठरते असे सांगून त्यांनी रासायनिक खताचा डोस पाण्याची मात्रा बियाणे कोणती आणि कशी घ्यावीत उसाच्या सरी मध्ये किती अंतर असावे किती खोली असावी का नसावी ठिबक सिंचन तज्ञांच्या सल्ल्यानुसार घेऊन आपल्या शेतामध्ये ही योजना राबवावी तसेच क्षारपड जमीन सुधारणा केल्याने शिरटी गावातील शेतकऱ्यांचे कौतुक केले आणि शेती विषयक बाबीवर सखोल मार्गदर्शन साळुंखे यांनी केले

प्रारंभी स्वागत रामगोंडा पाटील यांनी केले तर प्रस्ताविक संस्थेचे सेक्रेटरी रमेश चौगुले यांनी केले शास्त्रज्ञ साळुंखे यांचा परिचय राहुल चौगुले यांनी दिला यावेळी संस्थेचे चेअरमन संगीता भोसले,व्हा चेअरमन रमेश कुंभार, संचालक अनिल ढेकळे, विश्वास कांबळे, अजित टारे, महावीर दानोळे, रामचंद्र बंडगर, प्रदिप पाटील,बाबासो चौगुले,सागर मगदुम, संचालिका लता रोजे, प्रगतशील शेतकरी जयपाल शिरगावे अशोक चौगुले, हसुर चे नेमगोडा पाटील,मलगोडा पाटील,बाळासाहेब पाटील,आणि शिरटी,हसुर,कुटवाड, नृसिंहवाडी,बहुसंख्य शेतकरी उपस्थित होते,या कार्यक्रमास धवल कृषी सेवा केंद्र व रत्नदिप कृषी सेवा केंद्र शिरटी याचे मोलाचे सहकार्य लाभले शेवटी आभार रमेश चौगुले यांनी मानले,